**Newspaper: Maharashtra Times (Mumbai Times)**

**Date: 2nd May, 2020**



महाराष्ट्र टाइम्स

मुंबई TIMES

आंबट-गोड कैरी करी

चटक मटक २

मुंबई । शनिवार, २ मे २०२०

ADVERTORIAL, ENTERTAINMENT PROMOTIONAL FEATURE

# अंधारावर कोरला उजेड

**प्रत्येक जण आपापल्या परीनं करोनाविरुद्ध लढत असताना मोहम्मद उमर खान हा नेत्रहीन विद्यार्थीही यासाठी पुढे सरसावला आहे. त्यासाठी त्यानं जिद्दीनं शिवणकाम शिकून घेतलं. समाजकार्यामध्ये नेहमीच हिरिरीनं सहभागी होणाऱ्या, पोदार कॉलेजच्या या हरहुन्नरी विद्यार्थ्याविषयी.**

कार्तिक जाधव, कॉलेज क्लब रिपोर्टर

muntainbox@gmail.com

करोनाविरुद्ध लढण्यासाठी जो-तो आपलं छोटंसं का होईना योगदान देतोय. नेत्रहीन असूनही स्वतःला कुठल्याही प्रकारे कमी न समजता, मोहम्मद उमर खान या पोदार कॉलेजच्या विद्यार्थ्यानंही यात जिद्दीनं आपला वाटा उचलला आहे. करोनाशी लढण्यात मास्कचा तुटवडा जाणवत असताना त्यानं शिवणकला शिकून घेत स्वतः मास्क तयार करण्याची जबाबदारी घेतली. हे मास्क तो तातडीनं गरजूंपर्यंत पोहोचवतो आहे.

नेत्रहीन असला, तरी उमरनं आपल्या दिव्यांग असण्याचा कधी बाऊ केला नाही. दिव्यांगत्वावर जिद्दीनं मात करत तो विविध प्रकारच्या समाजकार्यात नेहमी सहभागी होत असतो. उमर मूळचा जळगाव जिल्ह्यातील चोपडा या गावचा. शिक्षणाची आवड असलेल्या उमरनं उच्च शिक्षण घेण्यासाठी मुंबई गाठली. सध्या पोदार कॉलेजमध्ये कॉमर्सच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेतो आहे. करोनाचं संकट आल्यावर त्याला गावी जावं लागलं. या कठीण काळातही त्याचं समाजकार्य थांबलं नाही. आता तो घरातले वापरात नसलेले, जुने कपडे स्वच्छ करून त्यापासून, सुरक्षेसाठी आवश्यक असलेले मास्क तयार करतो. हे मास्क तो आपल्या परिसरामधल्या गरजूंपर्यंत पोहोचवतो. उमर त्यासाठी शिवणकाम शिकला. त्यासाठी त्यानं खास शिकवणीदेखील लावली होती. शिवणकलेचा उपयोग करून घेत तो मास्क तयार करतोय. कुठल्याही सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणेच तो कॉलेजमध्ये वावरत असतो. कॉलेजच्या प्रिन्सिपल डॉ. शोबना वासुदेवन, प्राध्यापक वृषाली कणेरी आणि एनएसएस समन्वयक डॉ. विनिता पिंपळे यांनी आपल्याला मार्गदर्शन केल्याचं तो सांगतो.

उमरला आधीपासूनच समाजकार्याविषयी ओढ होती. त्यातूनच त्यानं कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा आयोगात भाग घेतला. आजवर त्यानं आपल्या सहकाऱ्यांसह विविध पथनाट्यं सादर केली आहेत. विद्यापीठाच्या वार्षिक ७ दिवसीय रहिवासी कॅम्पमध्येदेखील तो सहभागी झाला होता. याशिवाय उमर विविध वक्तृत्व स्पर्धांतदेखील भाग घेत असतो. कविता करण्याची त्याला आवड आहे.

करोनाविरोधी लढ्यात नेत्रहीन विद्यार्थ्याचं कौतुकास्पद पाऊल

“आपण दिव्यांग असल्याचा कधीही कुठल्याच प्रकारे उमर बाऊ कधीच करत नाही. उलट समाजकार्यामध्ये तो नेहमी पुढे असतो. एखाद्या सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणेच तो कॉलेजमध्ये वावरतो. आमच्या कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा आयोगाचा तो एक खंदा स्वयंसेवक आहे.

डॉ. शोबना वासुदेवन,
प्रिन्सिपल, पोदार कॉलेज

#MASKINDIA
महाराष्ट्र टाइम्स

समाजाला मदत करायची असल्यास ती फक्त आर्थिक मदतच करता येते असं नाही. समाजकार्य करण्यासाठी खूप वेगवेगळे मार्ग असतात. आपल्याला जो शक्य आहे तो मार्ग ज्यानं-त्यानं निवडावा.

उमर खान

## आम्हाला कळवा

करोनाविरुद्ध लढ्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची, प्रयत्नांची काही वेगळी उदाहरणं तुमच्या कॉलेजमध्येही असल्यास ती संपर्कक्रमांकासह 'मुंटा'ला नक्की कळवा.
muntainbox@gmail.com